मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 19 मार्च 2025 | पान- 1

# महापालिकेच्या 34 अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

## कार्यालयीन कामकाजावेळी अधिकारी गायब : 34 अधिकाऱ्यांना कारणे दाखवा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवटीत नागरिक अनेक विभागांत कामे घेऊन येतात. मात्र, विभागातील अधिकारी जागेवर नसल्याने भेटत नव्हते. त्यामुळे आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना भेटण्यासाठी अधिकारी उपलब्ध व्हावेत, यासाठी वेळ ठरवून दिली. मात्र, आता या भेटीच्या वेळेत बहुतांशी अधिकारी कार्यालयात नसतात. याबाबत आयुक्तांनी सामान्य प्रशासन विभागाकडून अहवाल मागितला असून, भेटीच्या वेळी वारंवार अनुपस्थित राहणाऱ्या ३४ अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले आहेत.



महापालिकेचे कार्यालयीन कामकाज सकाळी १० ते सायंकाळी पावणेसहापर्यंत सुरू असते. या वेळेत विविध कामानिमित्त नागरिक महापालिकेच्या विविध कार्यालयांत, विविध अधिकाऱ्यांकडे येत असतात परंतु, अधिकारी कार्यालयात गैरहजर असल्याने त्यांना भेटण्यासाठी नागरिकांना हेलपाटे मारावे लागतात. अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून ते साईटवर, बैठकीला किंवा कार्यक्रमाला असल्याचे कारण दिले जाते. याबाबत वारंवार तक्रारींमुळे आयुक्त सिंह यांनी नागरिकांना भेटण्यासाठी सोमवार, बुधवार आणि शुक्रवार हे तीन दिवस दुपारी ३ ते सायंकाळी ६ ही वेळ निश्चित केली. त्यानुसार कार्यालयात नागरिकांसाठी उपलब्ध राहण्याचे निर्देश दिले.

विभाग प्रमुखांसह सर्वच अधिकाऱ्यांनी दालनाच्या दरवाजावर नागरिकांना भेटण्याच्या वेळेचे फलक लावले. पण, त्या वेळेतच अधिकारी उपस्थित नसतात. ही बाब लक्षात आल्याने आयुक्तांच्या सूचनेनुसार सामान्य प्रशासन विभागाच्या तपासणी पथकाने सर्व कार्यालयांची पाहणी केली. त्यानुसार अहवाल आयुक्तांना दिला.

### हे अधिकारी गैरहजर होते..

» पथकाने केलेल्या दहा दिवसांच्या तपासणीत सर्वाधिक चार दिवस लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, सहायक आयुक्त अमित पंडित गैरहजर आढळून आले. नंतर अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता बाबासाहेब गलबले, सहायक आयुक्त तानाजी नरळे, उमेश ढाकणे, महेश वाघमोडे हे तीन दिवस जागेवर नव्हते. तर अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, मुख्य लेखापरीक्षक प्रमोद भोसले, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी नीळकंठ पोमण, नगररचना उपसंचालक प्रसाद गायकवाड, उपायुक्त मनोज लोणकर, सचिन पवार, पंकज पाटील, अण्णा बोदडे, सीताराम बहुरे, राजेश आगळे, प्रदीप ठेंगल, सहशहर अभियंता संजय खाबडे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे, सहायक आयुक्त अविनाश शिंदे, शीतल वाकडे, अजिंक्य येळे, विजय थोरात, मुकेश कोळप, सुचिना पानसरे, श्रीकांत कोळप, किशोर ननवरे, आयटीआय प्राचार्य शशिकांत पाटील, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे यांचाही एक-दोन वेळा भेटण्याच्या वेळी उपस्थित न राहणाऱ्यांमध्ये समावेश आहे.

"महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार, नागरिकांना भेटण्याची वेळ निश्चित करून दिली आहे. तपासणी पथकाने पाहणी करून दिलेला हा अहवाल तयार करण्यात आला. नागरिकांना भेटीसाठी उपलब्ध न राहणाऱ्या विभाग प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस देण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या आहेत.

- विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग.

---

# पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करा

## विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासातील चर्चेत आमदार शंकर जगताप यांची आग्रही मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पीएचडी मार्गदर्शक आणि सांगवी येथील बाबुराव घोलप महाविद्यालयातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापिकेने पीएचडी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याच्या प्रकरणावर विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात चर्चा झाली. आमदार शंकर जगताप यांनी या संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांना प्रश्न विचारले. पीएचडी मार्गदर्शकांकडून होणारे गैरव्यवहार रोखण्यासाठी कठोर उयोययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार जगताप यांनी केली.

आमदार शंकर जगताप यांनी विचारलेल्या प्रश्नांमध्ये संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेसह, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील नियंत्रण, विद्यार्थ्यांची गैरसोय, आणि पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर सरकारने कोणती पावले उचलली आहेत, या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी संबंधित प्राध्यापिकेच्या अटकेची घटना खरी असल्याचे मान्य केले. मात्र, विद्यापीठाच्या



संशोधन केंद्रांवर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांची छळवणूक होते, हा आरोप फेटाळला. तसेच, संशोधन केंद्रांमध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी नाकारला.

पुढील उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ऑनलाईन पोर्टलवर 'पीएचडी ट्रॅकिंग प्रणाली' कार्यान्वित करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना त्यांच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच, विद्यापीठाकडून सर्व संशोधन केंद्रांचे शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना संशोधनासाठी आवश्यक सोयीसुविधा पुरवणे हे संशोधन केंद्रांना बंधनकारक करण्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाच्या चौकशीसंदर्भात विद्यापीठाने आवश्यक ती माहिती संकलित केली असून, शासनस्तरावरही कार्यवाही करण्यात येत असल्याचे चंद्रकांतदादा पाटील यांनी सभागृहात सांगितले.

या चर्चेदरम्यान, पीएचडी मार्गदर्शकांकडून होणाऱ्या गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, विद्यापीठाच्या संशोधन केंद्रांवरील देखरेख अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे आमदारांनी अधोरेखित केले.

# पुण्यातील बंदोबस्तात वाढ, सतर्कतेचे आदेश

## नागपूर हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर संवेदनशील भागात बंदोबस्त

**पुणे | प्रतिनिधी**

नागपूरमधील हिंसाचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शहर, परिसरात सतर्कतेचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. शहरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आली असून, अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन पोलीस आयुक्तांनी केले आहे.

नागपूर शहरातील महाल परिसरात सोमवारी सायंकाळी दोन गटात वाद झाला झाला. वादातून दगडफेक, तसेच वाहने जाळण्याची घटना घडली. त्यानंतर पोलिसांनी ७० जणांना पकडले असून, नागपूरमधील परिस्थिती नियंत्रणाखाली आहे. नागपूरमध्ये उसळलेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर शहरात सतर्कतेचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना दिले. रात्रीपासून शहरातील वेगवेगळ्या भागात बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त वाढविण्यात आला आहे.



पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांनी घडामोडींवर बारकाईने नजर ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, संवेदनशील भागांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागपूरमधील हिंसाचाऱ्याच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेच्या पथकांना गस्त वाढविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये. काही अनुचित घटना प्रकार घडल्यास त्वरीत पोलीस नियंत्रण कक्षाशी (क्रमांक ११२) संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. समाज माध्यमात अफवा पसरविणारे संदेश पाठविल्यास कारवाई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

### अफवा पसरविणाऱ्यावर कारवाईचा इशारा

» समाज माध्यमांत अफवा पसरविणारे संदेश पाठविल्यास कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस आयुक्तांनी दिला आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. तसेच काही अनुचित प्रकार घडल्यास पोलीस नियंत्रण कक्षाला (११२) त्वरीत कळवावे असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# कर्जत ते लोणावळा, लोणावळा ते पुण्यापर्यंत तिसरी आणि चौथी मार्गिका करा

## अमृत भारत योजनेत कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकाचा समावेश करा : खासदार श्रीरंग बारणे यांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे ते लोणावळा दरम्यानची तिसरी आणि चौथी मार्गिका जमीन अधिग्रहण न झाल्याने रखडली आहे. पनवेलमध्ये देशातील सर्वात मोठे विमानतळ होत आहे. त्यामुळे कर्जत ते लोणावळा आणि लोणावळा ते पुण्यापर्यंत तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचे काम करावे. त्यामुळे पनवेल पासून थेट पुण्यापर्यंत जलद रेल्वे धावू शकतात. दुपारी दीड वाजता लोणावळ्यावरून पुण्याला जाणारी लोकल पुन्हा सुरू करावी. अमृत भारत योजनेत कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकाचा समावेश करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत केली.

केंद्र सरकारच्या २०२५-२६ या अर्थसंकल्पावरील चर्चेत खासदार श्रीरंग बारणे सहभाग घेतला. शिवसेनेच्या वतीने अर्थसंकल्पावर चर्चा केली. अर्थसंकल्पाचे स्वागत करतानाच मतदारसंघातील प्रलंबित रेल्वे प्रश्न पुन्हा एकदा सभागृहात मांडले. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, अर्थसंकल्पात रेल्वेच्या विकासासाठी महत्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या कार्यकाळात रेल्वेचे मोठे काम झाले. अनेक वर्षे ही कामे झाली नव्हती. रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी अर्थसंकल्पात २.५२ लाख कोटी रुपये देण्यात आले आहेत. मागील काही अर्थसंकल्पाच्या तुलनेत चार पटीने जास्त हा निधी आहे. पुढील तीन वर्षात १०० अमृत भारत ट्रेन, ५० नमो भारत ट्रेन आणि २०० वंदे भारत ट्रेन तयार करण्यात येणार आहेत. या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील रेल्वे विस्तार, रेल्वे विकासासाठी महत्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

महाराष्ट्राला सर्वाधिक २३ हजार ७७८ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यामुळे राज्यातील रेल्वेला गती मिळेल. शत प्रतिशत रेल विद्युतीकरण प्राप्त करणारे महाराष्ट्र प्रमुख राज्य आहे. यामुळे विजेची बचत होते. पर्यावरणाचे संरक्षण होत आहे. २०१४ पासून आतापर्यंत २ हजार १०५ किलोमीटर नवीन रेल्वे मार्ग विकसित करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील १३२ रेल्वे स्थानकांचा अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत विकास केला जात आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, आकुर्डी, तळेगाव दाभाडे, लोणावळा, पनवेल जंक्शनचा या योजनेअंतर्गत विकास केला जात आहे. कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकाचा या योजनेत समावेश करावा. हा मार्ग मुंबईपासून पुण्यापर्यंत जातो. या मार्गावरून सर्वाधिक प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे या योजनेत सहभागी करून घेऊन विकसित करावा. जेणेकरून प्रवाशांना सुविधा मिळतील. रेल्वे मार्गिकेच्या निर्माणासाठी ५० ते ६० टक्के किलोमीटर वाढवून १८३ किलोमीटर केले आहे. २०१४ पासून आतापर्यंत ४० हजार किलोमीटर अधिक रेल्वे लाइनचे विद्युतीकरण केले आहे. सौर, पवन ऊर्जाच्या माध्यमातून रेल्वे विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण केली जात आहे.



पनवेल आणि कर्जतच्या दरम्यान नवीन रेल्वे मार्ग बनत आहे. हा मार्ग लवकरच पूर्ण होईल. पनवेलमध्ये देशातील सर्वात मोठे विमानतळ होत आहे. त्यामुळे कर्जत ते लोणावळा आणि लोणावळा ते पुण्यापर्यंत तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेचे काम करावे. त्यामुळे पनवेल पासून थेट पुण्यापर्यंत जलद ट्रेन धावू शकतात. त्यामुळे विमानतळावर येणाऱ्या नागरिकांसह मुंबई, पनवेल, पुणे दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना सुविधा निर्माण होईल. पनवेल ते मुंबई दरम्यान लोकल ट्रेन धावत आहे. दीड लाख दररोज प्रवास करतात. सिडकोने बनविलेल्या रेल्वे स्थानकावर सुविधांचा अभाव आहे. रेल्वे विभागाने सिडकोसे चर्चा करून सुविधा निर्माण कराव्यात. माथेरानमध्ये नेरळपासून ट्रॉयट्रेन धावत आहे. पूर्वी दोन तासात जाणाऱ्या या ट्रेनला आता तीन तास लागत आहेत. येथे वर्षाला दहा लाख पर्यटक येतात. परंतु, एकच ट्रॉयट्रेन आहे. ट्रॉयट्रेनची संख्या वाढवावी. देशात पहिल्यांदाच विमानतळाप्रमाणे रेल्वे स्थानकावर सुविधा दिल्या जात आहेत. प्रत्येक रेल्वे स्थानक मॉडेल बनविण्याचे काम रेल्वे विभागाने केले आहे. प्लॅटफॉर्मवर सुविधा दिल्या जात आहेत. रेल्वे स्थानकावर क्रांतिकारकांची माहिती द्यावी. प्रवाशांना इतिहासाची माहिती मिळेल. कोरोना काळात बंद केलेल्या ट्रेन, थांबे, चालू करावे तिकीट दरातील ज्येष्ठ नाहरिकांची सवलत योजना पुन्हा चालू करावी, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

### तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेसाठी जागेचे भूसंपादन करा

» अर्थसंकल्पात घोषणा केली जाते. परंतु, प्रत्यक्षात वर्षानुवर्षे काम होत नाही. जागेचे भूसंपादन होत नाही. राज्य सरकारचा प्रतिसाद मिळत नाही. मावळ लोकसभा मतदारसंघात २०१७ मध्ये तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेची घोषणा केली होती. केंद्र सरकारने मंजुरी दिली. अर्थसंकल्पात त्याचा उल्लेखही केला होता. परंतु, जमीन अधिग्रहण व अन्य कारणांमुळे अद्यापही तिसरा आणि चौथा मार्ग रखडला आहे. मुंबईवरून पुण्याला जाणारा, सर्वाधिक वाहतूक असलेला हा मार्ग आहे. हा मार्ग झाल्यास प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. पुणे ते लोणावळा दरम्यान लोकल ट्रेन धावते. कोरोना काळात दुपारच्या वेळेत रेल्वे बंद केली होती. याबाबत अनेकदा पाठपुरावा करून बारा वाजता ट्रेन चालू केली. परंतु, दुपारी दीड वाजताची लोकल ट्रेन बंद असल्याने कामगार, महिला, विद्यार्थी विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे दीड वाजता लोणावळ्यावरून पुण्याला जाणारी लोकल पुन्हा सुरू करावी, असेही खासदार बारणे म्हणाले.

# महापालिकेसाठीचे इच्छुक 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत

## भाजपमध्ये इच्छुकांची सर्वाधिक संख्या, राष्ट्रवादीत होणार जोरदार इनकमिंग



**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महापालिका निवडणुका केव्हा होतील याबाबत कोणी ही ठामपणे सांगू शकत नाही. ओबीसी आरक्षण, प्रभाग रचना, निवडणुक जाहीर झाली तर ती जुन्या की नव्या जणगणनेनुसार होणार याबाबत मतभेद आहेत. त्यातच आरक्षण आणि प्रभाग रचना हे मुद्दे न्यायप्रविष्ट आहेत. त्यामुळे महापालिकेच्या निवडणूक ह्या दिवाळीनंतर होणार की त्यापेक्षा जास्त कालावधी लागणार याबाबत कोणीच स्पष्ट करू शकत नसल्याने निवडणुकांसाठी इच्छुक आत असणाऱ्यांमध्ये 'कोणता झेंडा घेऊ हाती' अशी परिस्थिती निर्माण झाल्याने ते सध्या 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत असल्याचे पाहावयास मिळत आहेत.

विविध पक्षातील प्रमुख पदाधिकारी मात्र अगोदर आपले बस्तान स्थिर करण्याच्या अनुषंगाने महायुतीतील घटकपक्षात स्थान मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रवेश करत आहेत. निवडणुकांचे वातावरण तयार झाल्यानंतर महाराष्ट्रातील सत्ताधारी महायुतीतील घटक पक्ष निवडणूक एकत्रित लढणार की स्वतंत्र लढणार हे समजल्यानंतरच इच्छुकांचे प्रवेश होतील, अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये जवळपास तीन वर्षापासून प्रशासकीय राजवट सुरु आहे. त्यामुळे आता विविध राजकीय पक्षासह शहरवासियांना महापालिकेच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. महायुतीत सहभागी तिन्ही घटक पक्ष आणि कार्यकर्ते महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याची तयारी करीत आहेत.

या पार्श्वभूमीवर शहरात भाजपचे संघटनात्मक काम मोठे आहे. त्यांच्याकडे कार्यकर्त्यांची फौज ही मोठी आहे. शहराचे नेतृत्व करणारे दोन विधानसभा आणि दोन विधानपरिषदेचे आमदार भाजपकडे आहेत. त्यांच्या दिमतीला शहर कार्यकारिणीसह असंख्य कार्यकर्ते आहेत. त्यामुळे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांचे मायक्रो प्लॅनिंग सुरु असून त्यामध्ये त्यांनी आघाडी घेतली आहे. सर्व प्रभागात त्यांच्याकडे इच्छुकांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे त्यांना बाहेरून कार्यकर्ते आयात करण्याची गरज नसल्याचे दिसत आहे.

महायुतीतील दुसरा घटक पक्ष असणाऱ्या शिवसेना एकनाथ शिंदे गटात खासदार श्रीरंग बारणे हे पिंपरी चिंचवड मध्ये नेतृत्व करीत आहेत. त्यामानाने पक्ष वाढण्यास भरपूर वाव आहे. परतू हाताच्या बोटावर मोजण्याएवढेच पदाधिकारी सध्या काम करीत आहेत. उबाठा गटातील काही प्रमुख पदाधिकारी यांनी प्रवेश केला आहे हे जरी खरे असले तरी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने स्वतंत्र निवडणूक लढवावयाची असेल तर सर्व प्रभागात उमेदवार निवडण्यासाठी शिंदे गटाची दमछाक होणार हे निश्चित आहे. परंतु सत्तेत असलेला पक्ष असल्याने निवडणुकीच्या तोंडावर विविध पक्षातील पदाधिकारी शिंदे गटात प्रवेश करू शकतात अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

आजमितीस पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांची दमछाक होणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) आणि शिवसेना उबाठा गटासमोर गळती रोखण्याचे आव्हान असणार आहे. शिंदे आणि अजित पवारांकडून आलेले पदाधिकारी, कार्यकर्ते पुन्हा स्वगृही गेले तर मात्र निवडणुकीच्या तोंडावर नव्याने पक्ष बंधने, निवडणुकीसाठी त्यांना ताकद देणे हे काम महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) , शिवसेना (उबाठा) आणि काँग्रेसला करावे लागणार आहे . त्यामुळे महापालिका निवडणुकीमध्ये भाजप सोडल्यास राष्ट्रवादी काँग्रेस , शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना उबाठा , काँग्रेस यांना निवडणुकीच्या तोंडावर पदाधिकाऱ्यांना ताकद देणे आवश्यक असल्याच्या प्रतिक्रिया कार्यकर्त्यांच्यातून उमटल्या आहेत.

### राष्ट्रवादीकडून कार्यकर्त्यांना बळ

» अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अद्यापही शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आलेली नाही. इतर समित्यांचे पदाधिकारी निवडले आहेत. शहराध्यक्षही निवडले आहेत. अजित पवार सध्या पुणे जिल्याचे पालकमंत्री आहेत. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा महापालिकेवर सत्ता काबीज करण्याच्या दृष्टीने ते प्रयत्न करत असल्याची चर्चा पक्षांतर्गत सुरू आहे. त्याअनुषंगाने त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात येणाऱ्या विकासकामावर लक्ष केंद्रित केले आहे. त्याचबरोबर त्यांचे सुपुत्र पार्थ पवार, राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांनीही पक्षाच्या नगरसेवकांना, पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरु केले आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भोसरी, पिंपरी आणि चिंचवड विधानसभा मतदार संघातील पदाधिकारी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले होते. ते पुन्हा स्वगृही येण्यासाठी प्रयत्नशिल असून त्यांच्या प्रवेशानंतर अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस गट मजवुत करण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

---

# महापालिकेच्या वतीने 7 पात्र ई-रिक्षा धारकांना अनुदान धनादेश वाटप

## शहरात आत्तापर्यंत 19 ई- रिक्षा धारकांना अनुदान धनादेशाचे वाटप करण्यात आले



**पिंपरी | प्रतिनिधी**

ई- वाहन धोरणांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील ७ ई रिक्षा धारकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिचे अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते प्रत्येकी ३० हजार रुपये अनुदानाच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. मागील महिन्यात देखील या ई- वाहन धोरणांतर्गत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते १२ ई – रिक्षा धारकांना अनुदानाच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले होते. अशा एकूण शहरात आत्तापर्यंत १९ ई- रिक्षा धारकांना अनुदान धनादेशाचे वाटप करण्यात आले.

राज्यात वाहनातून निघणाऱ्या धुरांमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होत यावर नियंत्रण मिळविण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने २०२१ पासून राज्यात ई- वाहन धोरण राबविण्यात येत आहे. या अंतर्गत इलेक्ट्रोनिक वाहन खरेदी करणाऱ्यांना अनुदान देण्याची योजना राज्य शासनाने आखली आहे. या अंतर्गत शहरातील नागरिकांसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ई – वाहन धोरणाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या ई- धोरणात सहभागी होऊन एल ५ एम, एल ५ एन, टी आर तसेच पारंपारिक वाहनांना रेट्रो इलेट्रीक किट करण्यात आलेली वाने अशा वाहनांना अनुदान देण्याची योजना राज्य शासनाची आहे.

ई वाहन खरेदी करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या मध्ये शहरातील ई- रिक्षा खरेदी करणाऱ्या अब्दुल कय्युम खान, सोमनाथ बाबुराव उबाळे, रोहन आनंद जाधव, गणेश बाळासाहेब गोफणे, खंडाप्पा सिद्धाराम माने, मोसिन बशीर खान, सादिक मोहम्मद उस्मान दलाल या सात जणांना आज अतिरिक्त आयुक्त इंदलकर यांच्या हस्ते अनुदानाचे धनादेश वाटप करण्यात आले. यावेळी सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त अण्णा बोदडे,कार्यकारी अभियंता कैलास दिवेकर, कनिष्ठ अभियंता सचिन मोरे यांच्यासह पत्रकार बांधव देखील उपस्थित होते.

### ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी मदत केंद्र..

» ई – वाहन धोरणांतर्गत वाहन खरेदी करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक असते. तसेच यासाठी वेगवेगळी कागदपत्रे देखील लागतात. एख्याद्याला अर्ज भरता येत नसेल किंवा अर्ज भरण्यात अडचणी येत असतील. अशा नागरिकांसाठी महापालिकेच्या यांत्रिकी विभागाच्या वतीने मदत केंद्र उभारण्यात आले आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# पुरंदर विमानतळाच्या कामाला येणार गती

## उद्योग विभागाकडून सात गावे औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर : अर्थसंकल्पात तरतूद नसल्याने संभ्रम

**पुणे | प्रतिनिधी**

प्रस्तावित पुरंदर विमानतळासाठी राज्य सरकारच्या उद्योग विभागाने सात गावांमधील दोन हजार ८३२ हेक्टर जागा औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करण्याची अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. मात्र राज्याच्या अर्थसंकल्पात याबाबत कोणतीही तरतूद न केल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. पुरंदर तालुक्यातील वनपुरी, पारगाव मेमाणे, कुंभारवळण, एखतपूर, उदाची वाडी, मुंजवडी, खानवडी या गावातील जमिनी औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत. लवकरच या गावांमधील जमिनीची मोजणी करून भूसंपादनाची प्रक्रिया सुरू होणार आहे.

पुरंदर तालुक्यातील सात गावांमधील जमिनीचे संपादन करण्यासाठी अधिसूचना काढण्यात आली आहे. उद्योग विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियमानुसार हे क्षेत्र निश्चित केले आहे. या गावांतील बागायती, जिरायती क्षेत्रांचे तसेच नैसर्गिक स्रोत, झाडे, विहीर, नाले, रस्ते, गावे, घरे यांची माहिती घेऊन विमानतळासंदर्भात दोन हजार ८३२ हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

या गावांमधील जमिनींवर एमआयडीसीचे शेरे मारण्यात येणार असून एमआयडीसी आणि महसूल विभागाच्या बैठकीत भूसंपादनाबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल. त्यानंतर वृत्तपत्रांत जाहिराती देऊन हरकती आणि सूचना मागविल्या जातील. त्यासाठी एका महिन्याचा कालावधी दिला जाईल. त्यानंतर जमिनीची मोजणी होवून भूसंपादनाच्या प्रक्रियेला सुरूवात होईल.



### विमानतळाच्या कामाला गती येणार : मोहोळ

पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामाला गती येणार असून २ हजार ८३२ हेक्टर क्षेत्र औद्योगिक क्षेत्र म्हणून निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेला गती येणार असल्याचे केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी समाजमाध्यमांवर म्हटले आहे.

**या गावातील होणार भूसंपादन**

**गाव (क्षेत्र - हेक्टरमध्ये)**

| | |
|---|---|
| वनपुरी - ३३९ | गुंजवडी - १४३ |
| कुंभारवळण - ३५१ | खानवडी - ४८४ |
| उदाची वाडी - २६१ | पारगाव - १,०३७ |
| एखतपूर - २१७ | एकूण - २,८३२ |

### पुरंदर विमानतळाचा प्रवास

» ऑक्टोबर २०१६ मध्ये पुरंदर विमानतळाची घोषणा करण्यात आली होती. सुरुवातीपासून या विमानतळाला विरोध झाला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात विमानतळाची जागा बदलण्यात आली. मात्र महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आले. त्यानंतर पूर्वीच्या जागीच पुढील पाच वर्षात विमानतळ होईल, अशी घोषणा करण्यात आली. मात्र वित्तमंत्री अजित पवार यांनी नुकत्याच मांडलेल्या अर्थसंकल्पात पुरंदर विमानतळासाठी कोणतीही तरतूद नव्हती. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. मात्र, सरकारने आता अधिसूचना जारी केल्याने त्याबाबत एक पाऊल पुढे टाकले आहे.

### सात बाधित गावांतील ग्रामस्थांचा विरोध

» औद्योगिक क्षेत्र म्हणून घोषणा झालेल्या सात बाधित गावांतील स्थानिकांनी भूसंपादनाला विरोध दर्शविला आहे. येत्या दोन दिवसांत संयुक्त ग्रामसभा घेऊन पुढील निर्णय घेणार असल्याचे ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे. तसेच राज्याच्या अर्थसंकल्पात कुठल्याच प्रकारची तरतूद किंवा उल्लेख झाला नसल्याने विमानतळाच्या प्रत्यक्ष भूसंपादनाबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

# आरटीई अंतर्गत प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी

## प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार : प्रवेशासाठी 24 मार्चपर्यंतची मुदत

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत (आरटीई) २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रियेत आता प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी दिली जाणार आहे. या विद्यार्थ्यांचे प्रवेश १८ मार्चपासून सुरू होणार असून, प्रवेशासाठी २४ मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. यंदा राज्यातील ८ हजार ८६३ शाळांमध्ये १ लाख ९ हजार ८७ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यासाठी ३ लाख ५ हजार १५२ अर्ज दाखल झाले होते. प्रवेशासाठी काढलेल्या सोडतीद्वारे १ लाख १ हजार ९६७ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. त्यानंतर १० मार्चपर्यंत ६९ हजार ६१० विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला. त्यामुळे उर्वरित जागांवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचा निर्णय घेण्यात आला.

प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या पहिल्या टप्प्यातील प्रवेश १८ मार्चपासून सुरू होणार आहेत. त्यामुळे प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या पालकांना लघुसंदेश पाठवला जाणार आहे. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी रिक्त जागांनुसारच लघुसंदेश पाठवण्यात येईल. मात्र, पालकांनी केवळ लघुसंदेशावर विसंबून न राहता आरटीई संकेतस्थळावरील अर्जाची स्थिती पाहणे आवश्यक आहे. पालकांनी प्रवेश मिळालेल्या पत्राची मुद्रित प्रत आणि आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या



पडताळणी केंद्रावर जाऊन पडताळणी समितीकडून २४ मार्चपर्यंत कागदपत्रांची तपासणी करून ऑनलाइन प्रवेश निश्चित करावा. प्रवेश निश्चित झाल्याची पावती घेऊन शाळेत जाऊन प्रवेश घ्यावा, असे गोसावी यांनी स्पष्ट केले आहे.